# कळवा वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना


पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २२३ /२०२५ दि. ३०/०९/२०२५

**–: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–**

**ज्याअर्थी, कळवा** वाहतूक उप विभागाचे हद्दीत दि. २२/०९/२०२५ ते दि.०२/१०/२०२५ या कालावधीत **नवरात्रोत्सव व दसरा सण** साजरा होत असून त्या दरम्यान **१)** विटावा गणेश घाट, **२)** शिवाजी चौक गणेश घाट, **३)** खारेगांव तलाव, **४)** पारसिक रेतीबंदर गणेश घाट येथे दि. ०२/१०/२०२५ रोजी मोठया प्रमाणात सार्वजनिक तसेच खाजगी नवरात्र देवी मूर्ती, घट आणि फोटो/प्रतिमा यांचे विसर्जन करण्यात येणार आहे. देवी मिरवणूकीचे मार्गावरील व विसर्जन घाटाचे परिसरात वाहतूक कोंडी होवू नये या करीता सदर भागात वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या साईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी**, मी, **पंकज शिरसाट, उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून,** मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए. –११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे.

**प्रवेश बंद –** **१)** नवी मुंबई बेलापूर रोडने तसेच ऐरोली–पटणी मार्गे विटावा जकात नाका–कळवा शिवाजी चौकातून ठाण्याचे दिशेने येणाऱ्या जड अवजड वाहनांना व टी.एम.टी./एन.एन.एम.टी./एस.टी. व खाजगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या बसेसना **विटावा जकात नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** **अ)** सदर जड अवजड वाहने ऐरोली–मुलूंड–आनंदनगर जकात नाका–पूर्व द्रूतगती महामार्गावरून इच्छित स्थळी जातील.
**ब)** टी.एम.टी./एन.एन.एम.टी./एस.टी. व खाजगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या बसेस हया विटावा जकात जंक्शन येथे प्रवासी उतरवून तेथूनच प्रवासी भरून परत नवी मुंबई कडे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) पूर्व द्रुतगती महामार्ग (रा.म.क्र. ३) वरील गोल्डन डाईज नाका येथून ठाणे शहरातून मिनाताई ठाकरे चौक–जी.पी.ओ. नाका–क्रिक नाका–कळवा मार्गे नवी मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या जड अवजड वाहनाना **गोल्डन डाईज नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने गोल्डन डाईज नाका–येथूनच पूर्व द्रुतगती महामार्गवरून कॅडबरी जंक्शन–नितीन जंक्शन–तीन हात नाका–कोपरी ब्रिज वरून आनंदनगर नाका–मुलूंड मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** **३)** रा.म.क्र. ३ खारेगांव टोलनाका येथून गॅमन जंक्शन – पारसिक सर्कल – मुंब्रा बायपास मार्गे नवी मुंबई च्या दिशेने जाणाऱ्या जड अवजड वाहनांना **खारेगांव टोलनाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने रा.म.क्र. ३ खारेगांव टोल नाका येथून सरळ–गोल्डन डाईज नाका–कॅडबरी नाका–नितीन कंपनी नाका–तीन हात नाका–कोपरी ब्रिजवरून–आंनदनगर जकात नाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** **४)** बाळकुम नाका–साकेत–क्रिक नाका येथून छत्रपती शिवाजी चौक, कळवा च्या दिशेने जाणाऱ्या जड अवजड वाहनांना **बाळकुम नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने बाळकुम–कापूरबावडी नाका–गोल्डन डाईज नाका–कॅडबरी नाका–नितीन कंपनी नाका–तीन हात नाका–कोपरी ब्रिजवरून–आंनदनगर जकात नाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ५) नवी मुंबई, पनवेल बाजूकडून तसेच कल्याण–मानपाडा–बदलापूर–अंबरनाथ कडून मुंब्रा–ठाणेच्या दिशेने येणाऱ्या जड–अवजड वाहनांना **शिळ फाटा** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने शिळ फाटा येथून महापे रोडने–रबाले–ऐरोली ब्रिज–मुलूंड–आनंदनगर चेकनाका–पूर्व द्रुतगती महामार्गावरून इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** **६)** शिळ फाटा येथून मुंब्रा बायपास मार्गे घोडबंदर रोड–नाशिक बाजूच्या दिशेने येणाऱ्या जड–अवजड वाहनांना **शिळ फाटा** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने शिळ फाटा येथेच यु टर्न घेवून परत महापे रोडने–रबाले–ऐरोली ब्रिज–आनंदनगर चेक नाका–पूर्व द्रुतगती महामार्गावरून इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद —** ७) मुंब्रा बाजूकडून पारसिक नाका मार्गे खारेगांव टोल नाका व ठाण्याचे दिशेने येणाऱ्या टी.एम.टी. व खाजगी वाहने यांना **पारसिक सर्कल** तसेच **जड अवजड वाहनांना शिळ फाटा** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग —** सदर बसेस पारसिक सर्कल येथे प्रवासी उतरवून तेथूनच प्रवासी घेवून परत मुंब्रा बाजूकडे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद —** ८) घोडबंदर रोड—गोल्डन डाईज नाका—गोल्डन डाईज नाका ओव्हरब्रिज—साकेत ब्रिज—खारेगाव टोलनाका—गॅमन चौक—पारसिक सर्कल पुढे मुंब्रा व नवी मुंबई करीता कळवा च्या दिशेने जाणाऱ्या जड अवजड वाहनांना **गोल्डन डाईज नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग —** सदर वाहने घोडबंदर रोड—गोल्डन डाईज नाका येथूनच—कॅडबरी नाका—नितीन कंपनी—तीन हात नाका—कोपरी ब्रिज वरून आनंदनगर जकात नाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना दुर्गादेवी मुर्ती विसर्जनाच्या दिवशी दि. ०२/१०/२०२५ रोजी दुपारी १२.०० ते सार्वजनिक तसेच खाजगी नवरात्र देवी मूर्ती, घट आणि फोटो/प्रतिमा यांचे विसर्जन कार्यक्रम संपेपर्यत अंमलात राहील.

सदर वाहतूक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, दुर्गादेवी मुर्ती विसर्जनातील वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/— सदर अधिसूचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

**प्रत सविनय सादर,**

मा. अपर पोलीस महासंचालक, (का.व सु.) मुंबई
मा. अपर पोलीस महासंचालक, वाहतूक म.रा. मुंबई
मा. पोलीस आयुक्त, नवी मुंबई
मा.विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र नवी मुंबई
मा. जिल्हाधिकारी, ठाणे, पालघर व रायगड जिल्हा
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा.पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा.अपर पोलीस आयुक्त, पूर्व/पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे व कल्याण

**प्रत :— माहिती व आवश्यक कारवाईसाठी**

पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामिण, पालघर व रायगड
पोलीस अधीक्षक, महामार्ग सुरक्षा, ठाणे
पोलीस उप आयुक्त, नवी मुंबई
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे

प्रत :— मा. आयुक्त, ठाणे, भिवंडी निजामपुर शहर, कल्याण—डोंबिवली व उल्हासनगर महानगरपालिका
मुख्याधिकारी, अंबरनाथ व कुळगांव— बदलापुर नगरपरिषद

प्रत :— मुख्यव्यवस्थापक (वाहतूक), जे.एन.पी.टी. न्हावासेवा, नवी मुंबई

प्रत :— स्विय सहाय्यक, मा.पालकमंत्री, जिल्हा—ठाणे

प्रत :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/— सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दीसाठी.

प्रत :— समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे
२/— सदर अधिसुचना पोलीस नोटीस मध्ये प्रसिध्दीसाठी

प्रत :— सर्व संबंधीत वाहतूक संघटना